# थोडक्यात

## शाहू कॉलेजातील विद्यार्थ्यांची निवड



**सायबर शिक्षा सायबर सुरक्षा या विषयावरील कार्यशाळेत सहभागी झालेले विद्यार्थी.**

**लातूर :** राजर्षी शाहू महाविद्यालय आणि क्विक हील फाउंडेशन, पुणे यांच्यातर्फे राबविण्यात येत असलेल्या सायबर शिक्षा सायबर सुरक्षा या उपक्रमासाठी माहिती तंत्रज्ञान विभागातील बीसीए व बीएस्सी सीएसमध्ये शिकत असलेल्या प्रतीक वर्मा (प्रेसिडेंट), प्रतीक्षा पांगे (सेक्रेटरी), ऐश्वर्या कुर्ले (कम्युनिटी डायरेक्टर) व वेदांत भूसेट्टे (मीडिया डायरेक्टर) या विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली. प्रा. ज्योती माशाळकर यांची टीचर कॉर्डिनेटर म्हणून निवड करण्यात आली. सायबर शिक्षा सायबर सुरक्षा उपक्रमाचे प्रशिक्षण पुणे येथील विमाननगर परिसरात क्विक हिल कंपनीच्या मुख्यालयातील कार्यशाळेत झाले. क्विक हील फाउंडेशनच्या अनुपमा काटकर, अजय शिर्के, सुगंधा दाणी आणि गायत्री पवार यांनी विद्यार्थी, शिक्षकांना माहिती दिली. प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. गोपाळराव पाटील, डॉ. पंढरीनाथ देशमुख, अनिरुद्ध जाधव, प्रा. सदाशिव शिंदे व प्रा. विश्वनाथ पांचाळ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.